पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

OW/DCP TRAFFIC THN/ADM/NOTIFICATION / 32 /2022 DATE 18/04/2022

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

संदर्भ :– १) OW/ DCP TRAFFIC/ADM/THANE ROAD WORK NOC/4804/2021, दि. ०४/०३/२०२१
२) वागळे वाहतूक उपविभाग यांचे कडील जा.क्र. १३९/२०२२, दि. ०७/०४/२०२२.
३) जा.क्र./ठामपा/साबां/नौ.को.प्र.स/का.अ./६२ दिनांक ०४/०३/२०२२

******

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका अंतर्गत वागळे इस्टेट वाहतूक उपविभागाचे कार्यक्षेत्रातील तीन हात नाका ते मॉडेला चेकनाका कडे जाणाऱ्या लेन वरील इटरनिटी मॉल ते रहेजा कट पावेतो रस्त्याचे कॉक्रीटीकरण व कल्व्हर्टचे काम पावसाळ्यापुर्वी करणे आवश्यक आहे. त्यामुळे तीन हात नाका कडून रहेजा मार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहतूक बंद करून सदर वाहतुकीस पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असले बाबतचे पत्र ठाणे महानगर पालीकेकडुन पत्र प्राप्त आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊन नागरीकांची गैरसोय होवू नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** तीन हात नाका कडुन मॉडेला चेकनाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना इटर्निटी मॉल समोरील एल.बी.एस. रोड तीन हात नाका मॅरेथॉन चौक येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ज्ञानसाधना कॉलेज कडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडने इटरनिटी सोसा – टाटा मोटर्स – एम.एस.ई.बी. कार्यालय – परबवाडी – शिवसेना शाखा – आनंद विश्व गुरूकुल कॉलेज – मेंटल हॉस्पिटल चौक – एस. बी. फिरके विद्यालय – रहेजा कट मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दिनांक १५/०४/२०२२ ते दिनांका ३१/०५/२०२२ रोजी पर्यत अंमलात राहील.

( बाळासाहेब पाटील )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

Scanned with CamScanner

**प्रत कार्यवाहीकरीता :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी

Scanned with CamScanner